I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 17-21
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोविड . १९ चे शेती व्यवसायावरील परिणाम

**प्रा. प्रताप शिद**
**श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय बावडा**
pratapshid@gmail.com

गोषवारा:

जागतिक स्तरावर महाभयंकर covid-19 रोगामुळे जागतिक स्तरावर सर्व क्षेत्रात मंदीची परिस्थिती अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे. शेती व शेतीपूरक क्षेत्रावरही दूरगामी परिणाम होत आहेत भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्था असल्यामुळे भारताला त्याचे मोठे परिणाम भोगावे लागतील.भारतात 23 मार्च पासून लोक डाऊन प्रक्रिया सुरू झालेली आहे. त्यामुळे भारतातील ऊस उत्पादक शेतकरी, दूध उत्पादक शेतकरी, पोल्ट्री उत्पादक शेतकरी इत्यादींना त्याचा सर्वाधिक फटका बसलेला आहे. परंतु सकारात्मक वृत्तीने ग्रामीण भागातील शेती व शेतीपूरक व्यवसायाकडे लक्ष दिल्यास नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन शेतकरी पुन्हा उभारी घेऊ शकेल. कोरोना आपत्ती ही इष्टापत्ती मानुन नियोजन केल्यास शेतकऱ्यांना उत्पन्न वाढवण्याची संधी मिळेल. यासाठी गरज आहे ती फक्त मानसिकता बदलण्याची आणि खडतर परिश्रम करण्याची.

**Key words: -** *Covid-19,* दूध उत्पादक, शेती पूरक व्यवसाय, कृषिप्रधान अर्थव्यवस्था

## प्रस्तावना:

भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्था असून शेती व्यवसायाला अनन्यसाधारण महत्त्वाचे स्थान आहे. अलीकडील काळात शेतकरी शेती पूरक व्यवसाय करत आहेत. कोरोना विषाणूने जगभरात थैमान घातले आहे. त्यामुळे बऱ्याच देशात लॉकडाऊन करण्यात आले. भारतातही 23 मार्च पासून लॉकडाऊन करण्यात आले. समाजातील प्रत्येक घटक या लॉकडाऊनने प्रभावित झाला आहे. यातील एक घटक म्हणजे शेती आणि शेतकरी. लॉकडाऊनमुळे शेतकरी व शेतीउद्योग मोठ्या अडचणीत सापडला आहे. शेतकरी वर्षभराचे नियोजन करून पीक लागवड करत असतो. खरिपात झालेला अतिपाऊस, मका, कपाशी यासारख्या पिकांवर आलेले रोग यामुळे घटलेले उत्पादन आणि पडलेल्या बाजारभावामुळे खरिपात शेतकऱ्यांच्या हाताला काही फार लागले नाही. आता रब्बीतही कोरोनाचे संकट उभे राहिले आहे.

## उद्दिष्टे

- covid-19 चे भारतीय शेतकऱ्यांच्या शेतीपूरक व्यवसायांवर होणारे परिणाम अभ्यासणे.

कोरोना या संसर्गजन्य आजारामुळे गेल्या २२ मार्चपासून देशात लॉकडाऊन सुरू आहे. याची झळ सर्वच क्षेत्राला बसली आहे.. शहरातून गावी परतणारे मजूर, कामगार, परप्रांतीय. शहरात भाजीमार्केटमध्ये उगीच होणारी गर्दी, गस्त घालणारे पोलिस, रुग्णांची काळजी घेणारी आरोग्य यंत्रणा, स्वतःचीच काळजी घेणारे शहरवाशीय, गरजूंना मदत करणारे दानशूर असे चित्र सध्या समाज माध्यमांमधून घरबसल्या दिसतेय. शहरी संस्कृतीचा प्रभाव असणारे सामान्य जणही पॉझिटिव्ह रुग्णांच्या जाती शोधण्यात मग्न आहेत. असे असले तरी शेतकरी बांधवांवर या आजाराचे काय परिणाम होत आहेत, याकडेही लक्ष गेले पाहिजे.

कोरोनाचा प्रकोप सुरू झाल्यावर सर्वात जास्त फटका शेतकऱ्यांना बसला आहे. कपाशी, मका, सोयाबीन यासारखी पिके लवकर काढून शेतकऱ्यांनी रब्बीसाठी आपली राने लवकर मोकळी केली. कमी कालावधीचे पीक घेऊन दोन पैसे हातात येतील, या एकाच आशेवर पदरमोड करून गहू, कांदे, टोमॅटो, टरबूज, काकडी, कोथिंबीर अशी पीके शेतकऱ्यांनी लावली होती. गहू व कांदा सोडला तर बाकी पिके ही रोजच्या रोज काढून बाजारात विक्रीसाठी न्यावी लागतात, नाही तर ती खराब होतात. लॉकडाऊनमुळे शेतात मजूर कामाला येत नाही. त्यामुळे माल काढता येत नाही. काढला तर तो विक्रीसाठी बाजारात नेण्यासाठी वाहन नाही आणि नेलेच

बाजारात तर विकले जाईल, याची कोणतीही हमी नाही. यामुळे शेतकऱ्यांना हा माल आपल्या डोळ्यांदेखत शेतात तसाच सोडून द्यावा लागला आहे. कलिंगड, खरबूज, काकडी, टोमॅटो, वांगी इत्यादी पिकांची ही अवस्था आहे. लग्नाचा सिजन डोळ्यासमोर ठेवून मोठ्या आशेने लावलेली, फुलवलेली ही पीके सोडून देताना शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे. ऊस हंगाम सरत असतानाच, करोनाने गाठल्याने साखर कारखाने अडचणीत आले. शेतीकामाला लॉकडाउनमधून वगळण्यात आले असले, तरी कामे पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. महाराष्ट्रात आठ लाख टन ऊस शिल्लक राहिल्याची शक्यता आहे. ISMA च्या अहवालानुसार महाराष्ट्रात 15 एप्रिल पर्यंत फक्त दहा साखर कारखाने सुरू होते. एकट्या कोल्हापूर जिल्ह्यात २१ हजारांवर ऊसतोडणी मजूर अडकून पडले होते. करोनाचा फटका पुढील हंगामाला मोठ्या प्रमाणावर बसण्याचा अंदाज आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर भागात सर्वत्रच ऊस हंगामाला या तीव्र झळा बसल्या आहेत. कामगारांचे पगार, ऊस उत्पादकांची देणी, कर्जाची थकीत देणी अशा फेऱ्यात कारखाने अडकले आहेत.

सरकारी संस्थांकडून धान्य खरेदीत निर्माण झालेला अडथळा. शेतातून पिके काढून बाजारात आणण्यातील अडथळे; कामगारांची कमतरता वाहतूक क्षेत्रात वाहनचालकांची कमतरता, मुख्य महामार्ग नाकेबंदी, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामातील अडथळे, किरकोळ कृषी बाजार ठप्प असणे, या घटकांमुळे गहू, द्राक्षे, टरबूज, केळी,, कापूस, मिरची,कोथिंबीर, कांदा आणि बटाटे अशा पिकांची खरेदी-विक्री करणा-यांसमोर पेचप्रसंग निर्माण झाला आहे. या अडथळ्यांमुळे कृषी क्षेत्रातील अनेक शेतीवस्तूंच्या किंमती खाली आल्या आहेत. मागणी घटल्याने द्राक्ष उत्पादकांना फार मोठा तोटा सहन करावा लागला आहे. लॉकडाऊनचे संकट कमी की काय त्यात अवकाळी पावसाने अजून संकटात भर टाकली. शेतात सोंगणीला तयार असलेला गहू अवकाळी पावसाने खराब झाला. ज्या गव्हाला किमान २००० ते २२०० रुपये क्किटल भाव अपेक्षित होता, तिथे आज १५०० रुपये क्विंटलने मागितला जात आहे. २५ मार्च २०२० पर्यंत मध्य-प्रदेशातील गव्हाचे दर २२०० प्रति क्विंटलपासून १६०० प्रति क्विंटलपर्यंत घसरले. बर्याच पिकांसाठी जाहीर केलेल्या किंमती किमान आधारभूत किंमतींपेक्षा कमी आहेत. कालांतराने शेतमालाच्या किंमती वाढल्या तरी, शेतक-यांना त्याचा लाभ होणार नाही; बहुतांशी लाभ हा घाऊक, किरकोळ व्यापारी व दलाल यांनाच होईल.कोविड १९ वाढता प्रसार आणि शेती, शेतकरी आणि अन्न धान्य उत्पादन यांची स्थिती पाहता येणार्या काळात जागतिक स्तरावर अन्नधान्य टंचाई निर्माण होण्याचा धोका संयुक्त राष्ट्र अन्न आणि सुरक्षा प्रमुखांनी म्हटले आहे

देशातील अनेक वस्तू-पुरवठा साखळ्या विस्कळीत झाल्या आहेत. लॉकडाउनच्या काळात अनेक गोष्टी जीवनावश्यक वस्तूंच्या यादीतून वगळल्या गेल्या. वाहतूक सुरू नसल्यामुळे ग्रामीण भागातील अन्नधान्य/भाजीपाल्याच्या विपणन व्यवस्थेतील पुरवठा-साखळीवर विपरीत परिणाम झाला. पोल्ट्री व्यवसायाला तर जबर फटका बसला. त्यातही सोशल मीडियामुळे शेतकऱ्यांच्या नुकसानीत भरच पडली. सोशल मीडियाचा वापर करणारे बरेच जण शेतकऱ्यांचीच मुले आहेत, जी आज शासकीय,खाजगी लहान मोठ्या नोकरीला आहेत, त्यांनी प्रथम चिकन खाल्ल्यानंतर कोरोना होतो, ही अफवा वार्यपिक्षा जोरात पसरविली. त्याचा परीणाम पोल्ट्री व्यवसायांवर झाला. कोंबडी कोणी विकत न घेतल्याने कोंबड्या कवडीमोल दराने दराने विकल्या जाऊ लागल्या. नंतर तर पोल्ट्रीवाल्यांनी कोंबड्यां मोकळ्या सोडुन दिल्या. काही पोल्ट्रीवाल्यांनी जिवंत कोंबड्या जेसीबीच्या साह्याने खड्डे खणून पुरून टाकल्या. व्हाटस् अप बहद्दार त्यावर जोक तयार करून,मजा घेऊ लागले. पोल्ट्री उद्योग उध्वस्त झाला. या मंडळींना यात आनंद होता. याचा परीणाम असा झाला की, कोंबड्या नष्ट झाल्याने,त्यांचे खाद्य मका ( पोल्ट्री फीड ) चे भाव अचानक कोसळले. २४०० रु. प्रति क्किटलचा मका उन्हाळ्यात १२०० रु झाला. आणि हा परीणाम पुढेही टिकुन राहिल. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले व होणार आहे. कोंबडी खाल्याने कोरोना होतो, ही अफवाच राहीली. व्हाटस्अप बहद्दारांचा आनंद मात्र झाला. त्यानंतर फळे विक्री करतांना एक कोरोणोग्रस्त थुंक लावतो आहे, अशी क्लिप जोरात चालली. अशा इतरही क्लिप व्हाटस् अपवर जोरात चालल्या. वास्तविक या यात तथ्यांश असेल तर त्या शासनाकडे पाठवुन त्यांची सत्यता पडताळणी करुन शासनाकडुन कारवाई करता आली असती. पण चुकीच्या पध्दतीने त्याचा वापर केला गेला. नंतर काही तज्ज्ञांनी त्याची तपासणी करुन त्या क्लिप पुर्वीच्या काळाच्या वेगवेगळ्या कारणांसाठी होत्या असे दिसुन आले. परंतु याचा परीणाम

फळांच्या बाजारावर झाला. त्यामुळे फळविक्रीवर मोठा परीणाम झाला. याचेही नुकसानीचे परीणाम आज शेतकरी भोगत आहेत. कलिंगड, खरबूज, केळी यासारखी फळे जास्त दिवस टिकत नाहीत. ती शेतातच सोडून द्यावी लागली.

दूध उत्पादक शेतकऱ्यांची अवस्थाही फारशी वेगळी नाही. हॉटेल आणि स्वीट मार्ट बंद असल्याने हजारो लिटर दूध शिल्लक राहिले. दूध कोणीही घ्यायला आज तयार नाही. शहरात त्याला ते दूध नेऊन विकणे शक्य नाही. सरकारने दूध घेण्याची घोषणा केली असली तरी त्यांचा दूध घेण्याचा कोटा मर्यादित आहे. महाराष्ट्रातील ८० टक्के दूध संकलन खासगी दूध उत्पादक संघाकडून केले जाते तर 20 टक्के दूध संकलन हे सहकारी व सरकारी दूध संघाकडून केले जाते. कोरोनाच्या निमित्ताने दुधाला असलेली मागणी कमी झाल्याचे कारण दाखवून अनेक दूध संस्थांनी दूध खरेदी दर कमी केला. खासगी दूधसंघ तर 18 ते 20 रुपये लिटर प्रमाणे दूध खरेदी करत आहेत. सरकारने 25 रुपये प्रति लिटर हा हमीभाव ठरवून दिला. मात्र एकाही खासगी दूध संघाने हा दर उत्पादकांना नाही.लोक पूर्वी दूध खरेदीचे दर 30 रुपये प्रति लिटर पेक्षा जास्त होते. दूध खरेदी दरात घट झाली मात्र पशुखाद्याच्या किमती वाढल्या. वाहतूक व्यवस्था बंद असल्याचे कारण या दरवाढी पाठीमागे सांगितले गेले. पशुधनाच्या बाबतीत पशुखाद्याची कमतरता निर्माण झाल्यामुळे उत्पादन खर्चामध्ये वाढ झाली. यावर उपाय म्हणून दुग्ध क्षेत्रासाठी कार्यक्रम खेळत्या भांडवलाच्या कर्जावरील व्याजात सूट देण्याची योजना केंद्र सरकारने आणली आहे त्यासाठी शंभर कोटी रुपयांचे अर्थसंकल्पीय तरतूदही करण्यात आलेले आहे.

याउलट परिस्थिती किराणा मालाची आहे. जो माल शेतकऱ्यांकडून घेऊन व्यापारी व दलालांनी गोदामे भरून ठेवली आहेत, त्या मालाचे म्हणजे शेंगदाणे, खाद्यतेलाचे दर लॉकडाउनमध्ये वाढतच आहेत. रासायनिक खते, औषधेही चढ्या दराने विकली गेली. याबाबत मात्र कोणीही आवाज उठवत नाही. आताही गावागावात प्रवेशबंदी घातली जात होती . मात्र गावातले गावकरी कुठेही जायला मोकळे होते. त्याच्यावर बंधन नाही. कोरोंटाईल नागरीक गावात मोकळे फिरतात, व्हाटस् अपवर ज्ञान शिकविणारे टोळक्याने गावात बसतात, फिरतात. बाप शेती काम करतो. व शेतमालाच्या किंमतीची चिंता करतो (त्याची त्यांना कसलीच काळजी नसते). त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही नाही. मात्र भाजीपाला गावात विक्रीला बंदी. वास्तविक गावात जागृतता आणुन भाजीपाला विक्री केला असता तर चालू शकले असते. अशा जागरूकते अभावी भाजीपाला मातीमोल भावाने विकला जात आहे. व याचा परीणाम शेतकऱ्यांवरच होत आहे. देवाने, निसर्गाने, कोरोनाने मारले तर, आपण समजु शकतो. ते आपल्या हातात नाही. पण आपलेच, सुपुत्र शेतीवर शिक्षण घेतलेले, बापालाच मारक ठरत आहेत. असे मत ॲड. प्रकाश पाटील यांनी त्यांच्या लेखात व्यक्त केले आहे. काही दिवसांपूर्वी एक बातमी वाचली. एक शेतकरी आणि त्याची बायको दोघांनी दिवसभर कोथिंबीर काढली. दुसऱ्या दिवशी त्याने ती विकायला नेली. बाजार बंद असल्या कारणाने त्याला कसेबसे 110 रुपये मिळाले दोघांचा दिवसभरचा रोज त्या शेतकऱ्याच्या हाती किती पैसे शिल्लक राहतील? संचार बंदीच्या काळात व्यापारी मात्र मालामाल झाले.

सोशल मीडिया वर आणखी एक मॅसेज व्हायरल झाला तो म्हणजे शेतकरी तुम्हाला सांभाळण्यासाठी शेतात काम करील तुम्ही निवांतपणे घरात बसा. प्रत्येक वेळेस शेतकऱ्यांनीच काम करावं हा कसला व्यवहार झाला? बरं शेतकरी काम करण्यास तयार आहे परंतु त्याचा मोबदला किती मिळतो? .वास्तविक शेतकरी पुत्रांनी त्यांचा सोशल मिडीयाचा वापर, शहरातील त्यांच्या ओळखी,त्यांची हुशारी याचा वापर शेतमाल विक्रीत झाला असता तर, शेतकऱ्यांचा निश्चितच फायदा झाला असता.

**उपाययोजना**

लॉकडाउनची परिस्थिती अजून अशीच कायम राहिली, तर शेतक-यांच्या समोरील अडचणी वाढत जातील. शेतकरी नेत्यांनी, समाजातील शेतीविषयी आस्था असलेल्या बुद्धिजीवी मंडळींनी हे शेतकऱ्यांचे प्रश्न जगासमोर मांडायला हवेत. शेतकऱ्यांना याची नुकसान भरपाई मिळायलाच हवी. शेतकऱ्यांना या अडचणीच्या काळात कशी मदत करायची याचा जरूर विचार व्हावा. इथून पुढे प्रत्येक वेळी सरकारवर अवलंबून राहता येणार नाही, आता शेतकऱ्यांनीही बदलले पाहिजे. संचार बंदीच्या काळात बाजार बंद आहेत ही इष्टापत्ती मानून आपला माल घर टू घर पोचवला तर उत्पादक ते थेट ग्राहक अशी शेतमालाची विक्री करता येईल. त्यामुळे व्यापारी आणि दलाल यांची साखळी खंडित करता येईल. आणि ग्राहकांनाही कमी पैशात शेतमाल मिळू शकेल. शेतकऱ्यांनाही त्यांच्या मालाचा योग्य मोबदला मिळू शकेल. म्हणून आता शेतकऱ्यांनी स्वतः

मार्केटिंगमध्ये उतरले पाहिजे. त्यासाठी शेतकरी समूहाच्या विक्री संस्थांचे जाळे उभारता येऊ शकते. कोरोणाच्या संकटामुळे प्रत्येक क्षेत्रातील बदल अटळ आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनाही आता बदलण्याशिवाय पर्याय नाही. थोडक्यात शेतकऱ्यांना कोरोणाच्या संकटाचा असाही फायदा करून घेता येईल. तसा तो करून घेतला तरच कोरोना ही शेतकऱ्यांसाठी इष्टापत्ती ठरू शकेल.

**सारांश:**

कोरोनामुळे शेतकरी आणि कष्टकरी वर्ग मोठ्या प्रमाणात भरडला जात आहे हे वास्तव आहे. वर्ष २०१९-२० चा जीडीपी दर पाहिला तर तिसर्या तिमाहीत सहा वर्षातील नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. लॉकडाऊनमुळे हा परिणाम अजून तीव्र होऊ शकतो. केपीएमजीने नुकताच प्रसिद्ध केलेल्या 'पोटेन्शियल इफेक्ट ऑफ कोविड १९ ऑन द इंडियन इकॉनॉमी' च्या अहवालात कोविड १९ मुळे जग महामंदीच्या उंबरठ्यावर उभे आहे. कोरोनामुळे पुरवठा आणि मागणीला सर्वाधिक फटका बसत आहे. आधी २०१९ मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेचा वेग मंदावला होता. आता कोरोनामुळे लॉकडाऊन असल्याने आंतरराष्ट्रीय घडामोडीना मर्यादा आल्या आहेत. या स्थितीवर लवकर मात केली नाही तर महामंदी दारात उभी आहे.

**संदर्भ**

1. ISMA अहवाल २०२०
2. KPMG अहवाल
3. महाराष्ट्र टाइम्स